झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्थाचेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा./सप्रा१/पर्वती/३३४/२०२४
दिनांक : १४/ ०३ /२०२४

## झोपडपट्टी पुनर्वसन आदेश
## ( झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना )

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये आदेश.

**प्रस्तावना –**

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे उक्त अधिनियम असा करणेत आला आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचनाक्र.झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे;

झोपडपट्टी पुनर्वसन या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्व साधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्व साधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

(२) ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद पर्वती येथील फा.प्लॉट ५३७, ( स.नं.१२१/१२२,) टी. पी. स्कीम, सिंहगड रोड, पर्वती, पुणे येथील मालमत्ता पत्रकानुसार १३५२४९.०० चौ.मी. क्षेत्र पुणे महानगरपालिकेने संपादित केले असुन त्यापैकी सावित्रीबाई फुले वसाहत, सिंहगड रोड, पर्वती, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्र सुमारे क्षेत्रफळ ४२१५.२२ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख या पुढे सदर मिळकत असा करणेत येत आहे) यावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवणे आवश्यक आहे; आणि,

(३) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व त्रिमिती पद्धतीने परीगणनेनुसार तसेच प्रत्यक्ष जागेवरील एकूण क्षेत्र ४२१५.२२ चौ.मी.असून सदर क्षेत्राचा झोपडपट्टी सदृश्य असल्याबाबतचा अहवाल उपआयुक्त, सिंहगडरोड क्षेत्रीय कार्यालय, पुणेमनपा, पुणेयांचेकडील पत्र जा. क्र. ४०१७, दि. २४/०८/२०२३ अन्वये प्राप्त झालेला आहे; आणि,

(४) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारित अधिनियम २०१७ चे कलम ३(क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी,झो.पु.प्रा.,पुणे हे सक्षम आहेत,आणि,

(५) ज्याअर्थी, दि. २४/०८/२०२३ रोजीचा झोपडपट्टी सदृश्य अहवाल उपआयुक्त, सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय, पुणे मनपा, पुणे यांनी या कार्यालयाकडे सादर केलेला आहे.तसेच या कार्यालयाचे तत्कालीन उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी यांचा दि.१८/१०/२०२३रोजी प्रत्यक्ष जागेवर स्थळपाहणी करुन जागेवर झोपडी सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. अनुसूचीमध्ये नमूद एकूण ४२१५.२२ चौ.मी.एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी नीलेश र. गटणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ क मधील नमूद तरतूदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून प्रस्तावित करण्या संदर्भात खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे .

**आदेश :-**

(१) अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्र झोपडपट्टी अधिनियम, १९७१ च्या कलम ३ क नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

(२) या प्राथमिक आदेशाद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले खाजगी व्यक्ती / शासकीय विभाग / सार्वजनिक प्राधिकरणे / स्थानिक संस्था यांना असे सूचित करण्यात येते की, त्यानी उक्त क्षेत्र पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत त्यांची कोणतीही सूचना /आक्षेप/हरकत असल्यास, ती सदरचा आदेश प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मुख्य कार्यकारी अधिकारी,झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे - १६ यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात आवश्यक ती कागदपत्रे आणि पुराव्यांसह सादर करावी. विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे आणि सबळ पुराव्याशिवाय दाखल केलेले कोणतेही आक्षेप / हरकती / सूचना / दावे या कार्यालयाकडे स्विकारले जाणार नाहीत अथवा विचारात घेतले जाणार नाहीत याची जाणीव याद्वारे करून देण्यात येत आहे.

(३) सदर प्रकरणी अधिनियमाच्या कलम ३क (१) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्याबाबत होणाऱ्या निर्णया विरुद्ध गृहनिर्माण विभागातंर्गत स्थापन मा.उच्च स्तरीय तक्रार निवारण समिती, बांद्रे, मुंबई यांच्याकडे अपिल दाखल करता येईल.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव : स.नं.१२१/१२२, फा. प्लॉट ५३७, सावित्रीबाई फुले वसाहत, सिंहगड रोड, पर्वती, पुणे**
**महानगरपालिका क्षेत्र : पुणे महानगरपालिका.**

| गाव | स.नं./ सि.स.नं./फा. प्लॉट | जमीनी मधील भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.)(त्रिमीती पद्धतीने प्रत्यक्ष जागेवरील मोजणी नुसार) | चतु:सिमा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| पर्वती, पुणे | स.नं.१२१/१२२, फा. प्लॉट ५३७ | पुणे महानगरपालिका | ४२१५.२२ चौ.मी. | **पुर्वेस**- पुल देशपांडे गार्डन<br>**पश्चिमेस**- लागू रस्ता<br>**दक्षिणेस** - नाला<br>**उत्तरेस** - लागू बोळ व पुल देशपांडे गार्डन |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

**स्थळ:**-पुणे.

**दिनांक:**-१४ / ०३ /२०२४.

नीलेश र. गटणे, ( भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवडक्षेत्र, पुणे.

प्रत :- **रजि. पोस्ट द्वारे - पर्वती, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करण्याच्या संदर्भातील कलम ३ क ची प्राथमिक अधिसूचना**

१. मा. आयुक्त, पुणे/ पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांनासदर जमीन निमशासकीय मालकीची असल्याने आपले लक्ष महाराष्ट्रझोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलनवपुनर्विकास) सुधारित अधिनियम २०१७ चे कलम ३ क व कलम १५ अ कडे वेधण्यात येत आहे.

२. मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना माहितीसाठी सादर.